संं.फौ.ख.क्र.३७३/२०२४
शासन वि. बलविंदर
**निशाणी क्र.१३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी शपथेवर सुरू</u> :–**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- नारायण देविदास सोळंके, |
| माझे वय | :- ४२ वर्षे, |
| व्यवसाय | :- पो.हे.कॉ. ब.नं.१२४१, पोलीस स्टेशन, पाथरी. |
| राहणार | :- पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी. |

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत</u> :–**

दिनांक ०१/१०/२०२४ रोजी मी पोलीस स्टेशन, मानवत येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गु.र.क्र.३९२/२०२४ कलम ६५–ई महाराष्ट्र दारुबंदी कायदा या गुन्हयाचा तपास माझ्याकडे आला होता. तपासकामी मला फिर्याद, प्रथम खबर अहवाल व जप्ती पंचनामा हे दस्त मिळाले होते. तपासादरम्यान, मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर मी जप्त मुद्देमाल मोहरील यांच्याकडे जमा केला. मी आरोपीची चेहरापट्टी नोंदवली व भा.ना.सु.सं. कलम ३५–३ प्रमाणे नोटीस दिली होती. आता मला अभिलेखावरील नोटीस दाखविण्यात आली. त्यावर माझी व आरोपीची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१४** देण्यात येते. त्यानंतर मी जप्त नमुना बाटली सी.ए. तपासणीकरीता नांदेड येथील वैद्यकीय प्रयोगशाळेत पाठवली. आता मला अभिलेखावरील सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१५** देण्यात येते. आरोपीला सुपूर्तनाम्यानुसार जप्त मोटारसायकलचा ताबा दिला. सुपूर्तनाम्यास **नि.१६** देण्यात येते. आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने प्रस्तुतचे दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. ती आज न्यायालयासमक्ष हजर आहे.

**<u>सरतपास पूर्ण</u>.**

संफौ.ख.क्र.३७३/२०२४
शासन वि. बलविंदर
**निशाणी क्र.१३**

**आरोपी तर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. डी. एच. दशरथे यांच्यामार्फत सदर साक्षीदाराचा उलटतपास सुरू :–**

**२.** फिर्यादी माझे सहकारी आहे. घटनास्थळाच्या आजुबाजूस हॉटेल्स असून नेहमीच वर्दळ असते. जप्त मुद्देमालाचा बॅच क्रमांक व उत्पादनाची तारीख मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमालासारखा मुद्देमाल सरकारमान्य दुकानात सहज उपलब्ध होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रृ. नि. स्वि.,

स्वाक्षरीत/–

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
मानवत.

मानवत.
दिनांक: ०४/०८/२०२६.